महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र २२८२९३६८
Email ID :comp.fd@maharashtra.gov.in

वित्त विभाग, मंत्रालय (विस्तार), दालन क्र.३३३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

क्र.सीओएम-२०२२/प्र.क्र.२३/संगणक कक्ष, दिनांक : १२ ऑगस्ट, २०२२

प्रति,

१. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव ( माहिती तंत्रज्ञान ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. उप सचिव (प्रशा-१), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. उप सचिव (उद्योग-४), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. संचालक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, मुंबई.

**विषय - प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या ६९ व्या बैठकीचे इतिवृत्त.**

महोदय,

वित्त विभाग ( खुद्द ) व वित्त विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यालयांकरिता संगणकीकरण विषयक प्रस्तावांवर निर्णय घेण्याकरिता प्रकल्प अंमलबजावणी समिती ( PIC ) गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीची ६९ वी बैठक दि.२८ जुलै, २०२२ रोजी संध्या. ४.०० वा. सचिव (वि.सु.), वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

२. सदर बैठकीचे इतिवृत्त माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सोबत जोडले आहे.

आपला,

सोबत :- वरीलप्रमाणे

( वि. अ. धोत्रे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
१) सचिव ( वित्तीय सुधारणा ), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२) निवड नस्ती (संगणक कक्ष)

वित्त विभाग/संगणक कक्ष

## विषय - प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या (PIC) ६९ व्या बैठकीचे इतिवृत्त.

वित्त विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीची ६९ वी बैठक सचिव ( वित्तीय सुधारणा), वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दि.२८ जुलै, २०२२ रोजी संध्या. ४.०० वा. त्यांचे दालन क्र. ३०५, मुख्य इमारत, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई येथे पार पडली.

प्रस्तुत बैठकीस समितीचे पुढील सदस्य आणि अन्य संबंधित पदाधिकारी हजर होते :-

१. श्रीम.शैला ए. , सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग तथा अध्यक्ष, प्रकल्प अंमलबजावणी समिती.
२. श्री. विनायक धोत्रे, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय
३. श्री.सु.मु.ऐगळीकर, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय
४. डॉ.पी.बी.मनोहर, अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय,
५. श्रीम.सुशिला पवार, अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय
६. श्री.क.सि.बडगुजर, अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय
७. श्री. राजेंद्र टंकसाळे, SeMT (DIT), SCTM
८. श्री. लक्ष्मीकांत गर्जे, टेक्निकल डायरेक्टर, NIC
९. श्री. वेंकटेश कृष्णा, ASiO, NIC

बैठकीत खालील विषयांवर चर्चा करुन निर्णय घेण्यात आले :-

### विषय क्रमांक १:- वित्त विभागात सल्लागारांच्या नियुक्तीसाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत:-

वित्त विभागातील दररोजच्या कामकाजामध्ये उपस्थित होणाऱ्या विविध मुद्यांच्या अनुषंगाने विश्लेषणात्मक अद्ययावत माहिती आवश्यक असते. याकरीता "Change Management" या प्रोफाईलमध्ये १ सल्लागाराची नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे. सल्लागारांकडून करण्यात येणाऱ्या कामकाजाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

- Study the distribution between the Union and the States of the net proceeds of taxes & suggestions for incorporating the requirement of the state government
- private support to department in budget preparation
- Identify provisions under grants-in-aid for meeting revenue expenditure of the States
- Co-ordinate with the relevant Departments/Government Agencies to obtain necessary data
- Evaluate impact of implementation of Centre Sector (CS) and Centrally Sponsored Schemes (CSS) from Government of India to the States
- Review criteria for devolution of various specific and fiscal equalization grants to local governments (PRIs and ULBs)

- Sector-wise performance analysis and demands
- Analyses/review the state of finances, including:
  - Demands for the state resources
  - Balancing the receipts, expenditure and borrowings
  - Potential for additional resource mobilisation
  - Comparative contribution of the State to the Central revenue and national economy
  - Fiscal projections within compliance of FRBM targets for additional performance grants form GOI
- Drafting of the memorandum through discussions and iterative revisions
- Preparation of presentations for various senior officials for a multitude of presenters and audience including the Chief Minister, Deputy Chief Minister, Chief Secretary, Finance Secretary etc.
- All other work related to financial management.

वित्त विभागासाठी " Change Management Consultant " प्रोफाईलमधील एक सल्लागाराच्या नियुक्तीसाठी दि. ०१ ऑगस्ट, २०२२ ते दि. १९ मार्च, २०२३ या कालावधीसाठी अंदाजे रू. १८.८४ लक्ष ( अक्षरी रूपये अठरा लाख चौ-यांशी हजार फक्त ) एवढा खर्च अपेक्षित आहे. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग ( माहिती तंत्रज्ञान ) दि. ९ मे, २०१९ मधील तरतुदीनुसार, " Change Management Consultant " नियुक्तीच्या प्रस्तावास विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग ( माहिती तंत्रज्ञान ) दि. २३ सप्टेंबर, २०११च्या परिच्छेद १२.७ अनुसार रू. १०.०० लक्ष ते रू. ५.०० कोटीपर्यंतच्या खर्चाचे, माहिती तंत्रज्ञान विषयक प्रस्ताव, प्रकल्प अंमलबजावणी समितीने तपासून मंजूर करणे आवश्यक आहे.

**समितीचा निर्णय :-**

माहिती तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णय क्र.GAD-मातंस ०८०/४/२०१४-O/O Directorate Of IT-DIT ( MH ) दि. ९ मे, २०१९ मध्ये उध्दत केलेल्या तरतूदीचा अवलंब करून वित्त विभागासाठी एक " Change Management Consultant " नियुक्त करण्यासाठी दि.०१ ऑगस्ट, २०२२ ते दि.१९ मार्च, २०२३ पर्यंत येणा-या रू.१८.८४ लक्ष ( अक्षरी रूपये अठरा लाख चौऱ्यांशी हजार फक्त ) इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता दिली.

---

**विषय क्र. २ :- "Change Management Consultant" या पदाकरीता योग्य उमेदवारांची निवड करणे. :-**

श्री. ऐगळीकर, उप सचिव (प्रशा-१), वित्त विभाग यांनी दिलेल्या माहितीनुसार "Change Management Consultant" निवड करण्यासाठी शासन निर्णय दि. ९ मे, २०१९ मध्ये नमूद केलेल्या M/s Deloitte/ Ernst & Young/ Grant Thornton/ KPMG/ PwC/ Wipro या ६ सल्लागार सेवा देणा-या संस्थांना आमंत्रित करण्यात आले होते. तथापि, बैठकीस केवळ KPMG संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते. उपस्थित प्रतिनिधी १) श्रीमती सोनिया सिंग, २)

श्रीमती शौर्या टंडन, ३) श्री. अजिंक्य भांबेरे ४) श्री. क्षितिज यांनी समितीसमोर सल्लागार सेवेसंबंधी सादरीकरण केले.

नियुक्त करावयाच्या "Change Management Consultant" पदाकरीता KPMG कंपनीकडून खालील कर्मचाऱ्यांचे सी.व्ही.रिपोर्ट प्राप्त झाले आहेत :-

| अ.क्र. | कंपनीचे नाव | सल्लागाराचे नाव | शैक्षणिक अर्हता | अनुभव | पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | KPMG | Ms. Shaurya Tandon | 1) PG in Public Policy 2) B.A.Economics | ६ वर्षे | Consultant |
| | | Mr. Ajinkya Bhambere | 1) C.A. 2) I.C.W.A. | ६ वर्षे | Consultant |

KPMG यांच्या उपस्थित प्रतिनिधींनी उपरोक्त श्रीमती शौर्या टंडन व श्री.अजिंक्य भांबेरे हे सल्लागार म्हणून काम करण्यास तयार असल्याचे बैठकीत सांगितले.

**समितीचा निर्णय :-**

माहिती तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णय क्र.GAD-मातंस ०८०/४/२०१४-O/O Directorate Of IT-DIT ( MH ) दि. ९ मे, २०१९ नुसार सुधारीत केलेल्या सेवा दर, अटी व शर्तीवर खालीलप्रमाणे श्रीम. शौर्या टंडन यांची शैक्षणिक अर्हता व या क्षेत्रातील अनुभव विचारात घेऊन सादरीकरणाच्या आधारे त्यांची "Change Management Consultant" म्हणून नियुक्ती करण्यास समितीने मान्यता दिली.

| संस्थेचे नाव | सल्लागाराचे नाव | पद | सेवादर (मासिक) | दि. ०१ ऑगस्ट, २०२२ ते दि. १९ मार्च, २०२२ खर्च |
|---|---|---|---|---|
| KPMG | Ms. Sharuya Tandon | Change Management Consultant | रु. २,४७,५००/- | रु. १८.८४ लक्ष |

श्रीमती शौर्या टंडन यांना रुजू करुन घेण्याच्या अगोदर माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या दि.०९.०५.२०१९ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव यांची मूळ कागदपत्रे तपासून खात्री करण्यासाठी समितीने या समितीने सदस्य सचिव यांना प्राधिकृत केले.

शेवटी उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

(शैला ए.)
सचिव ( वित्तीय सुधारणा ) तथा
अध्यक्ष प्रकल्प अंमलबजावणी समिती.